# लवथवती विक्राळा

Lavthavti Vikrala — Shankar Aarti · Samarth Ramdas Swami

लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ।
वीषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥
लावण्यसुंदर मस्तकीं बाळा ।
तेथुनियां जल निर्मळ वाहे झुळझुळां ॥१॥

> जय देव जय देव जय श्रीशंकरा ।
> आरती ओवाळू तुज कर्पूरगौरा ॥ धृ ॥

कर्पूरगौरा भोळा नयनीं विशाळा ।
अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ॥
विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा ।
ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥२॥

देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें ।
त्यामाजीं अवचित हळाहळ उठिलें ॥
तें त्वां असुरपणें प्राशन केलें ।
नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥३॥

व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी ।
पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी ॥
शतकोटीचें बीज वाचें उच्चारी ।
रघुकुळटिळक रामदासा अंतरीं ॥४॥